

पिंपरी महापालिकेच्या विकास आराखड्यात सुधारणा करणार

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in बुधवार दिनांक 09/07/२०२५ METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 151 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com


# विकसित 'महाराष्ट्र- 2047' सर्वेक्षणासाठी नागरिकांना प्रोत्साहित करा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



राज्य शासनाने १०० दिवसांच्या यशस्वी अंमलबजावणीनंतर दिनांक ०६ मे २०२५ ते दिनांक ०२ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत १५० दिवसांचा कार्यक्रम राबविण्याची घोषणा केली आहे. त्यामध्ये 'विकसित महाराष्ट्र @२०४७' करिता 'व्हिजन डॉक्युमेंट' तयार करण्याचा समावेश करण्यात आला आहे. 'विकसित महाराष्ट्र- २०४७' सर्वेक्षणात सहभागी होण्यासाठी विधानसभेतील सर्व सदस्यांनी, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नागरिकांना प्रोत्साहित करावे, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज विधानपरिषद व विधानसभेत निवेदनाद्वारे केले.

'विकसित महाराष्ट्र २०४७' चे 'व्हिजन डॉक्युमेंट' तयार करण्यासाठी दीर्घकालीन उद्दिष्टे – महाराष्ट्र @ २०४७, मध्यमकालीन उद्दिष्टे महाराष्ट्र @ ७५ व अल्पकालीन उद्दिष्टे ठरविण्यात आली आहेत. 'विकसित महाराष्ट्र - २०४७' च्या 'व्हिजन डॉक्युमेंट' चा मसुदा तयार करण्यासाठी क्षेत्रनिहाय १६ गट स्थापन करण्यात आले आहेत. राज्याच्या प्रादेशिक संतुलित विकासाला चालना देण्याकरिता प्रगतीशील, शाश्वत, सर्वसमावेशक व सुशासन असे चार प्रमुख आधारस्तंभ निश्चित करण्यात आले आहेत. 'विकसित महाराष्ट्र- २०४७'च्या व्हिजन मध्ये नागरिकांचे मत, अपेक्षा, आकांक्षा व प्राथम्यक्रम जाणून घेण्याच्या दृष्टीने राज्यव्यापी नागरिक सर्वेक्षण दि. १८ जून, २०२५ ते १७ जुलै, २०२५ या कालावधीत घेण्यात येत आहे.

विधानसभेतील सर्व सदस्यांनी आपल्या समाजमाध्यमांद्वारे, मेळावे, बैठकांमध्ये 'विकसित महाराष्ट्र – २०४७' च्या नागरिक सर्वेक्षणात सर्व नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन करावे. तसेच सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी व अन्य आस्थापनांच्या माध्यमातून नागरिकांना सर्वेक्षणात भाग घेण्यासाठी प्रोत्साहित करावे. महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या क्युआर कोड व लिंक वरून सर्वेक्षणात सहभागी होता येईल.

सर्व नागरिकांनी या सर्वेक्षणात सहभागी होऊन 'विकसित महाराष्ट्र २०४७' बाबत आपली संकल्पना व आकांक्षा याबाबत राज्य शासनाच्या संकेतस्थळावर दिलेल्या क्युआर कोड वरुन व्हॉटस्अप चॅटबॉटद्वारे आपला प्रतिसाद द्यावा, असे आवाहन उपमुख्यमंत्री पवार यांनी केले.

# रखडलेल्या कामांवर विधान परिषदेत आ.गोरखेंचा 'खडा सवाल'

## "कामांची गुणवत्ता निकृष्ट, वाहतूक कोंडी गंभीर ; दोषींवर कारवाईची मागणी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी येथील दापोडी ते निगडी दरम्यानच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील विकासकामांमध्ये मोठ्या प्रमाणावर दिरंगाई, अनियमितता आणि प्रशासनाची निष्क्रियता यामुळे नागरिक त्रस्त झाले असून, या गंभीर प्रश्नावर भाजप आमदार अमित गोरखे यांनी विधानपरिषदेत आवाज उठवला. गोरखे म्हणाले की, "या विकासकामांच्या दिरंगाईमुळे नागरिकांना दररोज २-३ तास वाहतूक कोंडीत अडकावे लागते, कामावर जाणाऱ्यांचा मौल्यवान वेळ वाया जातो, आणि संपूर्ण परिसरात अस्वस्थता पसरली आहे." विशेषतः मोरवाडी चौक ते चिंचवड चौकदरम्यान रस्ते अरुंद व अर्धवट अवस्थेत असल्याने गंभीर वाहतूक समस्या निर्माण झाली आहे. नागरिकांच्या तक्रारीनुसार, कामाची गुणवत्ता अत्यंत निकृष्ट असून, सुरक्षेच्या प्राथमिक नियमांचेही पालन केले जात नाही. कार्यरत असलेल्या ठेकेदारांकडून नियमांचे उल्लंघन होत असूनही, महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांकडून कोणतीही ठोस कारवाई केली जात नसल्याचे निदर्शनास आले आहे.

गोरखे यांनी विधानपरिषदेत सांगितले की, "महानगरपालिका अधिकारी आणि ठेकेदारांमध्ये लागेबांधे असल्याचा नागरिकांचा आरोप असून, त्यामुळे कामात पारदर्शकता आणि जबाबदारीचा अभाव आहे." या पार्श्वभूमीवर, आमदार अमित गोरखे यांनी संबंधित कामाची तातडीने उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी आणि तांत्रिक ऑडिट करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी विधान परिषदेत केली.

त्यांनी हेही स्पष्ट केलं की, "नागरिकांच्या सहनशीलतेचा अंत झाला असून, प्रशासनाने यापुढे दुर्लक्ष केल्यास आंदोलनात्मक मार्ग पत्करावा लागेल." प्रशासनाने तातडीने पुढील कामासाठी जागा ताब्यात घ्यावी, रस्ते पूर्णपणे रुंदीकरण करून वाहतूक कोंडीचा प्रश्न निकाली काढावा, अशी आग्रही भूमिका आमदार गोरखे यांनी मांडली.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
बुधवार दिनांक 09/07/२०२५
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# पिंपरी-चिंचवडकरांवर अन्याय होणार नाही!

## मंत्री उदय सामंत यांची ग्वाही !

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी-चिंचवड शहराचा प्रारुप विकास आराखडा (DP) अंतिम करताना कोणत्याही भूमिपुत्रावर अन्याय होणार नाही. गोरगरिबांची घरे बाधित होणार नाहीत. देवस्थानच्या जमिनींवर पडलेल्या आरक्षणांची तपासणी करुन रद्द केली जातील, असे आश्वासन कॅबिनेट मंत्री उदय सामंत यांनी सभागृहात दिले.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि नगर रचना विभागाने शहराचा प्रारुप विकास आराखडा दि. १५ मे २०२५ रोजी प्रसिद्ध केला आहे. त्यावर हरकती आणि सूचना मागवण्यात आल्या आहेत. दि. १४ जुलैपर्यंत हरकती-सूचना मांडता येणार आहेत. या आराखड्यावरुन शहरात गेल्या दोन महिन्यांपासून चर्चा रंगली आहे. पिंपरी-चिंचवडकरांच्या आक्षेपांसह पावसाळी अधिवेशनाच्या निमित्ताने शहरातील भाजपाचे आमदार महेश लांडगे आणि आमदार शंकर जगताप यांनी लक्षवेधी सूचना मांडली.



आमदार शंकर जगताप म्हणाले की, डीपी तयार करताना चुकीच्या पद्धतीने केला आहे. बांधकाम परवाने घेतलेल्या जमिनींवर आरक्षण टाकले आहे. पुनावळे येथील कचरा डेपोचे आरक्षण रद्द केले आणि त्या ठिकाणी कमर्शिअल कॉम्प्लेक्सचे आरक्षण टाकले आहे. HCMTR मधील साडेतीन किलोमीटरवर लिनिअर गार्डन विकसित केले आहे. पण, प्रारुप विकास आराखड्यामध्ये त्याचा विचार केलेला नाही. आहे तसे आरक्षण ठेवले आहे. थेरगाव येथेसुद्धा हजारो नागरिक बेघर होणार आहेत. अधिकाऱ्यांनी चुकीच्या पद्धतीने मंत्रीमहोदय यांना माहिती दिली. त्यामुळे मंत्रीमहोदय यांनी गोलगोल फिरवणारे उत्तर दिले. सभागृहाला अधिकारी चुकीची माहिती देत आहेत. बांधकाम परवागनी घेतलेले आरक्षणे रद्द करावीत.

आमदार महेश लांडगे म्हणाले की, सध्या प्रारुप आराखडा तयार झाला आहे. त्यामध्ये सुधारणा करण्यात येतील. पण, जुन्या डीपीतील 850 आरक्षणे नव्याने प्रस्तावित केली आहेत. जागेवर जावून आरक्षणे निश्चित करावीत. मोशी-आळंदी भागातील कत्तलखाना मुख्यमंत्र्यांनी रद्द केला. आमच्या देवस्थानच्या जमिनींवर आरक्षण पडले आहे. ती आरक्षणे रद्द केली पाहिजेत. शहरातील गोरगरिबांनी अर्धा गुंठा, एक गुंठा घेवून बांधलेली घरे बाधित होता कामा नये. भूमिपुत्र भूमिहीन झाला नाही पाहिजे. यासह कोणावरही अन्याय होवू नये, अशी स्पष्ट भूमिका मांडली. तसेच, SACCC चे आरक्षण कमी करावे. 25 एकरावर असलेले चऱ्होलीतील गार्डनचे आरक्षण कमी करावे आणि ग्रामस्थांसह स्थानिक नागरिकांचे श्रद्धास्थान असलेल्या देवस्थानच्या जमिनींवरील प्रस्तावित आरक्षणे रद्द करावीत. भूमिपुत्रांच्या हिताचा विचार केला पाहिजे. शेतकरी भूमिहीन होता कामा नये. ब्लू लाईन आणि रेड झोनमधील आरक्षणे विकसित करण्यासाठी शेतकऱ्यांना चांगला परतावा मिळावा. यासाठी ‘युडीसीपीआर’च्या नियमावलीमध्ये सुधारणा केली पाहिजे. प्रत्येक पिंपरी-चिंचवडकरांनी दाखल केलेल्या हरकती-सूचनांवर नि:पक्षपणे कार्यवाही केली पाहिजे. विकास आराखडा अंतिम करावा, अशी मागणीही आमदार लांडगे यांनी केली.

एमआरटीपी अधिनियम 1966 अन्वये कलम 22 अन्वये सुधारित आराखड्यामध्ये आरक्षणे प्रस्तावित केली जातात. डीपीची कार्यवाही पूर्ण केल्यानंतर तक्रारी आणि सूचनांचा विचार केला जातो. त्यानंतर प्रारुप आराखडा शासनाकडे मंजुरीसाठी जातो. आराखड्यामध्ये सुधारणा करण्याचे अधिकार शासनाला आहेत. पूर्वीपासून असलेल्या देवळांवर आरक्षणे पडली असतील, तर ती तापासून घेणार आहोत. शासन कोणावरही अन्याय होवू देणार नाही. हरकती आणि सूचनांचा विचार करुन पिंपरी-चिंचवडचा डीपी निश्चित केला जाईल. शेतकऱ्यांवर अन्याय होणार नाही. घरमालकांवर अन्याय होणार नाही, अशी शासनाची भूमिका आहे आणि त्यानुसार योग्य तो निर्णय घेतला जाईल.

- उदय सामंत, कॅबिनेट मंत्री.

# पिस्तूल बाळगल्याप्रकरणी दोघांना अटक!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

बेकायदेशीरपणे पिस्तूल बाळगल्याप्रकरणी तळेगाव दाभाडे पोलिसांनी दोघांना अटक केली. ही कारवाई रविवारी (६ जुलै) सायंकाळी पुणे-मुंबई महामार्गावर घोरवडेश्वर डोंगराजवळ करण्यात आली. अशोक बाळू भारती (२२, कासार आंबोली, मावळ), प्रशांत उर्फ पैलवान शांताराम आंबेकर (२६, देवळे, मावळ) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी पोलिस अंमलदार प्रीतम सानप यांनी तळेगाव दाभाडे पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पुणे-मुंबई महामार्गावर घोरावडेश्वर डोंगराच्या पायथ्याला प्रदीप सिरॅमिक क्रोकरी समोर दोघेजण पिस्तूल घेऊन आले असल्याची माहिती तळेगाव दाभाडे पोलिसांना मिळाली.



3
दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
बुधवार दिनांक 09/07/२०२५
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# पवना नदीचे पुनरुज्जीवन होणार ; महानगरपालिकेचे प्रकल्प

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने पवना नदीचे पुनरुज्जीवन करण्याकरिता महात्वाकांक्षी प्रकल्पाचे नियोजन आहे. पिंपरी चिंचवड शहराच्या मध्यवर्ती भागातून पवना नदी वाहत असून तिची लांबी २४.४० किलोमीटर आहे. त्यानुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत अनुभवी तांत्रिक सल्लागार मे.एच.सी.पी. डिझाईन अन्ड मॅनेजमेंट प्रा.लि. यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

सदर सल्लागाराने संपूर्ण पवना नदीचा सव्हे करून नदीच्या पाण्याचे प्रदुषण कमी करणेसाठी व पूर नियंत्रण विषयक काम करणेसाठी विस्तृत प्रकल्प अहवाल तयार केलेला आहे. सदर पवना नदीचे पुनरुज्जीवन प्रकल्पाचा हायड्रोलॉजी व हायड्रोलिक्स अहवाल भारत सरकारच्या Central Water and Power Research Station, Pune (CWPRS) मार्फत तयार करणेत आला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत पवना नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाकरिता पर्यावरण ना हरकत दाखला मिळणेसाठी महाराष्ट्र शासनास दि.१०/१२/२०१९ रोजी अर्ज करणेत आला आहे. महाराष्ट्र शासनाच्या मा. State Expert Appraisal Committee 3 (SEAC-3) समितीमार्फत दि. ०८/०८/२०२३ रोजी मंजुरी प्राप्त झाली आहे. तदनंतर सदर अर्जावर महाराष्ट्र शासनाच्या मा. The State Environment Impact Assessment Authority(SEIAA) समिती मार्फत वेळोवेळी बैठक घेणेत आली होती. मा.S E I A A समितीमार्फत दि.१५/०५/२०२५ रोजी बैठक आयोजित केली होती. मा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी वेळोवेळी झालेल्या बैठकीमध्ये प्रकल्पाबाबचे माहितीचे सादरीकरण केले होते.

दि.०७/०७/२०२५ रोजी मा. SEIAA समितीच्या बैठकीचा सभावृतांत प्रसिद्ध झाला असून त्यामध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पवना नदीचे पुनरुज्जीवन प्रकल्पास पर्यावरण ना हरकत दाखला देणेत आला आहे. सदर प्रकल्पाकरिता राज्य व केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झालेनंतर निविदा कार्यवाही करून नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाचे काम करणेत येणार आहे. सदर पवना नदी पुनरुज्जीवन प्रकल्प नदी काठाचे संरक्षणासाठी, नदीकाठाची होणारी झीज टाळणेसाठी, जैव विविधता वाढीसाठी, पक्षांची घरटी, निवासस्थाने निर्माण करणेसाठी ठिकाणे, जवळचे जलाशय व नदीमध्ये जलचराचे वाढीसाठी, एकंदरीत नैसर्गिक नदीचे पुनरुज्जीवनासाठी उपयोगी ठरणार आहे.

# दापोडी एस.टी. कार्यशाळा घोटाळा प्रकरणी दोषींवर कारवाई होणार!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



दापोडी : पुणे जिल्ह्यातील दापोडी येथील राज्य परिवहन महामंडळाच्या मध्यवर्ती कार्यशाळेतील भांडार खरेदीत झालेल्या गैव्यवहारप्रकरणी दोषी आढळणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई होणार, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. याबाबत सदस्य संदीप क्षीरसागर यांनी प्रश्न उपस्थित केला होता.

मंत्री सरनाईक म्हणाले, या प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागास प्राथमिक माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे.

रा. प. मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी पुणे येथील भांडार खरेदी बाबत सहाय्यक लेखा परिक्षण अधिकारी, रा. प. अंतर्गत लेखा परिक्षण पथक, पुणे यांच्याकडून विशेष लेखा परिक्षण करण्यात आले. या प्रकरणी अनियमितता झाल्याचे दिसून आले. या प्रकरणी १५ अधिकाऱ्यांची चौकशी केली असता ते अधिकारी दोषी आढळले असून त्यांच्या मासिक पगारातून १० टक्के रक्कम घेण्यात आली आहे.

महामंडळामार्फत महालेखापरीक्षकांनाही चौकशी करण्याची विनंती करण्यात येईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

# डेक्कन जिमखाना भागात अपघात ; दुचाकीस्वार गंभीर जखमी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : डेक्कन जिमखाना भागातील भुयारी मार्गाच्या कठड्यावर भरधाव दुचाकी आदळून झालेल्या अपघातात दुचाकीस्वार तरुण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली. कठड्यावर आदळल्यानंतर दुचाकीस्वार तरुण थेट भुयारी मार्गात कोसळला. अपघातात त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. धवल नारखेडे (वय २२, रा. द्वारिकानगर, सिडको, छत्रपती संभाजीनगर) असे गंभीर जखमी झालेल्याचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दुचाकीस्वार धवल हा सोमवारी (७ जुलै) सकाळी साडेसातच्या सुमारास भरधाव वेगात डेक्कन जिमखाना भागातून निघाला होता. गरवारे भुयारी मार्गावरील छोट्या पुलाच्या कठड्यावर भरधाव दुचाकी आदळली. त्यानंतर त्याचे नियंत्रण सुटले आणि तो दुचाकीसह भुयारी मार्गात कोसळला. अपघातात धवलच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली.धवलची बहीण पिंपरीत राहायला आहे. तो पुण्यात नोकरीच्या शोधात होता. त्याला एका खासगी ठिकाणी नोकरी मिळाली होती. कामाला जात असताना ही दुर्घटना घडली. गंभीर जखमी झालेल्या धवल याला तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. हवालदार बोराटे तपास करत आहेत.

# पिंपरी महापालिकेच्या विकास आराखड्यात सुधारणा करणार

## कोणावरही अन्याय होणार नाही, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ग्वाही

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी-चिंचवड शहराचा प्रारुप विकास आराखड्यात (डीपी) नागरिकांच्या राहत्या घरांवर रस्त्यांची आरक्षणे टाकली असतील तर ती काढली जातील. अनावश्यक आरक्षणाबाबतही निर्णय घेतला जाईल. आराखडा अंतिम मान्यतेसाठी राज्य शासनाकडे आल्यानंतर त्यात आवश्यक ते बदल केले जातील. त्यातून नागरिकांना दिलासा जाईल. विकास आराखड्यात कोणावरही अन्याय होणार नाही, अशी ग्वाही नगरविकास विभागाची जबाबदारी असलेले उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. त्यामुळे नागरिकांनी घाबरुन जावू नये असे आवाहन शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी दिली.

खासदार बारणे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, नगरविकास विभागाचे सचिव असीम गु्प्ता यांची भेट घेतली. महापालिकेच्या विकास आराखड्याबाबत असलेला नागरिकांचा रोष शिंदे यांना सांगितले. आराखड्याविरोधात नागरिकांच्या सुरु असलेल्या आंदोलनाची सविस्तर माहिती दिली.राज्य सरकार जनतेला दिलासा देणारा बदल आराखड्यात करेल अशी ग्वाही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दिली. पिंपरी-चिंचवड शहराचा प्रारुप विकास आराखडा 15 मे 2025 रोजी प्रसिद्ध केला आहे. त्यावर हरकती आणि सूचना मागवण्यात आल्या आहेत. 14 जुलैपर्यंत हरकती-सूचना मांडता येणार आहेत. आत्तापर्यंत 20 हजारांहून अधिक हरकती आल्या आहेत.

खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, विकास आराखड्यात चुकीच्या पद्धतीने आरक्षणे टाकली आहेत. अधिकाऱ्यांनी ताळतंत्र बाळगले नाही. शहराचा आढावा घेतला नाही. महापालिका आजपर्यंत आरक्षणे ताब्यात घेऊ शकली नाही. तीच आरक्षणे पुन्हा कायम ठेवली आहेत. 25 वर्षांत आरक्षणे ताब्यात घेण्यात यश आले नाही. तर, प्रशासन आता कसे ताब्यात घेणार आहे. कार्यालयात बसून आराखडा तयार केला आहे. स्थळपाहणी केली नाही. निळी पुररेषा वाढविण्यात आली आहेत. राहत्या घरांवर, सोसायट्यांवर रस्ते आरक्षणे टाकली आहेत. थेरगाव, वाल्हेकरवाडीसह चिंचवड परिसरातील हजारो नागरिक बेघर होणार आहेत. अनावश्यक, चुकीच्या पद्धतीने आरक्षणे टाकली आहेत. बांधकाम परवाने घेतलेल्या जमिनींवर आरक्षण टाकले आहे. त्यामुळे घरांवरील रस्त्यांची आरक्षणे तातडीने रद्द करावीत, अशी मागणी खासदार बारणे यांनी केली.

त्यावर उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, विकास आराखड्यात घरांवर रस्ते दाखविले असतील. चुकीच्या पद्धतीने आरक्षणे टाकली असतील. तर, आराखडा बदलून दुरुस्त करण्याचा संपूर्ण अधिकार नगरविकास विभागाला आहे. हरकती, सूचनांवर सुनावणी झाल्यानंतर अहवाल शासनाकडे येईल. त्यात घरांवरील रस्त्यांचे आरक्षण रद्द केले जाईल. त्यामुळे हरकती, सूचना नोंदवाव्यात. आराखडा शासनाकडे आल्यानंतर हरकती आम्हाला द्याव्यात. आराखड्यात कोणावरही अन्याय होणार नाही, याची सरकार काळजी घेईल. छत्रपती संभाजीनगर येथील आराखड्यातही अशाच त्रुटी झाल्या होत्या. त्यात बदल केला आहे. त्यामुळे कोणीही घाबरुन जाऊ नये, रितसर हरकती नोंदवाव्यात.

# बीव्हीजी संस्थेचा ठेका रद्द करण्याची मागणी!

## कॉंग्रेस शहराध्यक्षा सायली नढे यांचे आयुक्तांना पत्र

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी : पिंपरी चिंचवड महापालिकेच्या जिजामाता रुग्णालयात बीव्हीजी संस्थेद्वारे पुरविल्या जाणाऱ्या वॉर्ड बॉय आणि इतर कर्मचाऱ्यांच्या ड्रेसकोड उल्लंघनामुळे रुग्ण आणि नातेवाइकांमध्ये गोंधळ निर्माण होत असल्याचा गंभीर आरोप पिंपरी चिंचवड शहर महिला कॉंग्रेस कमिटीच्या अध्यक्षा सायली नढे यांनी केला आहे. यासंदर्भात त्यांनी महापालिका आयुक्तांना पत्र लिहून बीव्हीजी संस्थेचा ठेका रद्द करून ड्रेसकोडचे काटेकोर पालन करणारी नवीन संस्था नियुक्त करण्याची मागणी केली आहे.सायली नढे यांनी पत्रात नमूद केले आहे की, बीव्हीजी संस्थेच्या कर्मचाऱ्यांसाठी निश्चित केलेला ड्रेसकोड पाळला जात नाही. यामुळे रुग्णालयातील प्रशासकीय कामकाज आणि रुग्णसेवेवर विपरीत परिणाम होत आहे. याशिवाय, अनेक कर्मचारी दुपारी जेवणासाठी घरी जात असल्याने, बाहेर जाताना एखाद्या कर्मचाऱ्याला काही झाल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार, असा सवालही त्यांनी उपस्थित केला आहे."जिजामाता रुग्णालयातील रुग्णसेवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे. बीव्हीजी संस्थेचा ठेका रद्द करून नवीन आणि जबाबदार संस्थेची नियुक्ती करावी," अशी मागणी नढे यांनी केली आहे. त्यांनी आयुक्तांना या प्रकरणी त्वरित कार्यवाही करण्याची विनंती केली आहे.या मागणीमुळे रुग्णालयातील सेवेच्या गुणवत्तेचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला असून, महापालिका प्रशासन यावर काय निर्णय घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968